क्र. एसडब्ल्यूएम-१०९०/प्र.क्र. ५७/फ-६
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १३ जानेवारी, २०००.

प्रति,

मुख्य वनसंरक्षक (उत्पादन)
महाराष्ट्र राज्य,
नागपूर.

विषय :- आरागिरणी परवाना हस्तांतर व आरागिरणीचे स्थानांतर करणेबाबत.

संदर्भ :- (१) आपले पत्र क्र. कक्ष-१६/आगि/परवाना/हस्तां/६६४/९७-९८, दि. १.९.१९९७.
(२) कक्ष-१६/आगि/स्था/औरंगाबाद/२०३६/९८-९९, दि. १८.१२.९८.

उपरोक्त विषयाबाबतच्या आपल्या वरील संदर्भाधिन पत्राकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

२. राज्यातील आरा गिरण्यांच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक १७१/९६ मध्ये दि. ४.३.९७ आणि दि. ८.५.९७ रोजी दिलेले आदेश पाहता आपल्या कार्यालयाने दि. ५.४.९७ च्या ज्ञापन क्रमांक कक्ष-१६/आगि/परवाना/हस्तां/२३/९७-९८ अन्वये सर्व वन अधिकाऱ्यांना कळविले आहे की, आरागिरणी परवान्याचे हस्तांतर व आरागिरणीचे स्थानांतर करण्यास परवानगी दिल्यास सर्वोच्च न्यायालयाच्या सदर आदेशाचे उल्लंघन होईल. तथापि सर्वोच्च न्यायालयाने त्यांचे सदरहू आदेशात आरागिरणीच्या स्थानांतराबाबत कोणताही उल्लेख केलेला नसल्याने आरागिरणीचे स्थानांतरास परवानगी दिल्यास सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होईल किंवा कसे याबाबत राज्याचे मा. महाअधिवक्ता यांचे मत घेण्यात आले. त्यांनी दि. ९.१२.१९९९ आणि दि. २४.१२.१९९९ रोजी दिलेल्या अभिप्रायाच्या प्रती आपल्या अवलोकनार्थ सोबत जोडल्या आहेत.

३. मा. महाअधिवक्ता यांनी त्यांचे अभिप्रायात असे नमूद केले आहे की, उत्तर प्रदेश शासनाकरीता सर्वोच्च न्यायालयाने दि. ८.५.९८ रोजी आरागिरणी स्थानांतरास परवानगी

दिली आहे, तथापि अशा गिरण्या वनापासून १० कि. मी. अंतरावर असणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरहू गिरणी परवाना ही शासन अधिसूचना दि. १८.५.८९ मधील ( १० कि.मी. अंतराबाबतचे ) असलेले निदेश कायम करतात. त्यामुळे वनापासून १० कि. मी. अंतराच्या बाहेर सार्वजनिक हितार्थ आरा गिरणीचे स्थानांतर केल्यास सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ४.३.९७ च्या आदेशाचा भंग होणार नाही. तसेच शासनाच्या धोरणानुसार लातूर येथे ग्रेन मार्केट येथून शहराच्या बाहेर परंतु वनापासून १० कि.मी. अंतराच्या बाहेर गिरणींना स्थानांतर करता येईल. आरा गिरण्यांच्या स्थानांतरास परवानगी दिल्यास सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार प्रत्येक प्रकरण तपासून, स्थानांतराबाबत असलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन होईल याची खातर जमा करुन आणि सर्वोच्च न्यायालयाने दि. ८.५.९७ व ८.५.९८ रोजीचे दिलेल्या आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे लागेल.

४. मा. महाअधिवक्ता यांचे अभिप्राय लक्षात घेता आरागिरणीच्या स्थानांतरास परवानगी दिल्यास सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा भंग होणार नाही. परंतु आरागिरणीच्या स्थानांतर प्रकरणात केवळ सार्वजनिक हितार्थ आणि अत्यंत अपवादात्मक परिस्थितीमध्ये प्रत्येक प्रकरण गुणवत्तेनुसार तपासून परवानगी देता येईल. त्यामुळे आपल्या कार्यालयाने आरागिरणीच्या स्थानांतराबाबत दि. ५.४.१९९७ व २३.५.१९९७ च्या परिपत्रकान्वये घातलेली बंदी उठविण्यात येत आहे.

५. आरा गिरणीच्या स्थानांतराबाबत दि. २८.८.१९९१ च्या शासन अधिसूचना क्र. एसडब्ल्यूएम - २०९०/प्र.क्र.५७/फ-६, अनुसार जरी, उपवनसंरक्षक /वनसंरक्षक आणि मुख्य वनसंरक्षक यांना अधिकार असले तरी याबाबत शासनाचे असे आदेश आहेत की, आरागिरणीच्या स्थानांतराच्या प्रकरणात मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांचे अभिप्रायानंतर शासनाची अंतीम परवानगी आवश्यक राहील. यानुसार आरागिरणीच्या स्थानांतराबाबतचे सर्व प्रकरणे शासनाची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय गिरणीच्या स्थानांतरास मंजूरी देण्यात येवू नये. अशी प्रकरणे ही सार्वजनिक हितार्थ आणि अत्यंत अपवादात्मक परिस्थितीमध्ये आहेत याची मुख्य वनसंरक्षकांनी खातरजमा करुनच शासनाकडे प्रस्ताव सादर करावा. आरागिरणीच्या स्थानांतराबाबत शासनाची अंतिम परवानगी राहील. ही बाब सर्व वनसंरक्षक, उपवनसंरक्षक आणि उपविभागीय वन अधिकारी यांना कळविण्यात यावी.

६. आपल्या उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये ग्रेन मार्केट लातूर येथील आरागिरणी स्थानांतर करण्याबाबत पाठविलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात आपणास असे कळविण्यात येते की, मा. महाअधिवक्ता यांनी दिलेल्या वरील सल्ल्यानुसार ग्रेन मार्केट लातूर येथील आरागिरण्यांना स्थानांतर करण्याबाबतचे प्रकरण हे सार्वजनिक हितार्थ असल्याने संबंधित गिरण्यांना शासकीय राखीव तथा संरक्षित वनापासून १० कि. मी. अंतराच्या बाहेर आणि दि. २८.८.९१

च्या शासन अधिसूचनेमध्धील असलेल्या शर्तींच्या अधीन राहून आरागिरण्यांचे स्थानांतर करण्याचा परवानगी देण्यात येत आहे.

७. वरील नुसार आपण केलेल्या कार्यवाहीची माहिती शासनाच्या अवलोकनार्थ सादर करावी.

(सं. का. गंद्रे)
कक्ष अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रतिलिपी :-

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
वनसंरक्षक, औरंगाबाद वनवृत्त, औरंगाबाद.
उपविभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद वन विभाग, उस्मानाबाद.

यांजकडे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.